# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक १२/०६/२०२४ (बुधवार) दुपार

---

### चोरीचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे कळमेश्वर अंतर्गत_मौजा वरोडा शिवारात दि. १०/०६/२०२४ रोजी फिर्यादी नामे– संजय गणपतराव चालखोर वय ४८ वर्ष रा. ब्राम्हणी, वैशालीनगर, कळमेश्वर हा आपल्या शेतात ढोरांना चारापाणी करण्याकरिता गेला असता, ढोरांना चारापाणी करून घराकडे निघाला असता आरोपी नामे– १) चेतन राजेंद्र गोतमारे, वय १९ वर्ष २) विधीसंघर्ष बालक ३) हीमांशु इंगळे, वय १९ वर्ष तिन्ही रा. भंडागी रा. भंडारा हे शेतात घुसुन विहीरीकडे मोटार पंपचे कॉपर वायर चोरी करण्याचा प्रयत्न करताना मिळुन आले.

सदर आरोपींना कळमेश्वर पोलीसांनी ताब्यात घेतले. सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रीपोर्ट वरून आरोपीविरूद्ध पोस्टे कळमेश्वर येथे कलम ३७९, ५११, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपी क्र. ०१ यास सुचनापत्रावर सोडण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कळमेश्वर येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक योगेश कामाले, सफौ मन्नान नवरंगाबादे, पोशि राणासिंग यांनी पार पाडली.

### पोस्टे सावनेर हद्दीत अवैधरित्या मोहाफुल गावठी दारूची तस्करी करणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

दिनांक ११/०६/२०२४ रोजी पोस्टे सावनेर येथील स्टाफ पोस्टे परिसरात प्रोव्हिशन रेडकामी फिरत असताना गोपनीय माहिती मिळाली की, पोस्टे सावनेर हद्दीतील चिचपुरा ते पांढुर्णा बायपास रोडवर तसेच वार्ड क्र. १ बाजार चौक पाटणसांवगी येथे दोन ठिकाणी अवैध्य दारूची विक्री होत असल्याची गोपनिय माहीती सावनेर पोलीसांना मिळाल्याने पोलीस स्टेशन सावनेर येथिल स्टाफसह सदर ठिकाणी जावुन रेड केली असता ०२ इसमांवर कारवाई करण्यात आली. महिला आरोपी ही सावनेर हद्दीतील चिचपुरा ते पांढुर्णा बायपास रोडवरील आपले पाणठेल्यात अवैधरीत्या मोहाफुल दारू बाळगुन विक्री करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून महिला आरोपी हिच्या पानठेल्याची दारू बाबत झडती घेतली असता एका प्लास्टीक डबकी मध्ये १० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती १०० रू लिटर प्रमाणे एकुन १००० रू चा माल अवैधरीत्या मिळुन आल्याने ताब्यात घेतला.

तसेच आरोपी नामे– प्रज्वल सिध्दार्थ पक्कीडे, वय २६ वर्ष रा. वार्ड क्र. १ बाजार चौक पाटणसांवगी याचे राहते घराची दारू बाबत झडती घेतली असता एका पांढऱ्या रंगाचे प्लास्टिक डबकी मध्ये अंदाजे २० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती २०००/– रु. चा मुद्देमाल अवैद्यरित्या मिळून आल्याने ताब्यात घेतला. दोन्ही आरोपी विरुद्ध पो.स्टे सावनेर येथे कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे सावनेर येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर, पोहवा सुधाकर शेंद्रे, पोशि नासीर, अंकुश मुळे, मपोशि ज्योत्सना यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर